मुक्तागिरी

# छ. शिवाजी कॉलेजमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर भवनचे सोमवारी उद्घाटन

## खा. शरद पवार यांची उपस्थिती : ना. दिलीप वळसे पाटील यांचा पै. इस्माईलसाहेब मुल्ला जीवनगौरव पुरस्काराने होणार सन्मान

सातारा : येथील रयत शिक्षण संस्थेच्या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९४७ साली स्थापन केलेले छत्रपती शिवाजी कॉलेज हे संस्थेचे पहिले कॉलेज. यांचा कॉलेजमध्ये कमवा आणि शिका योजनेतून पदवी मराठी पर्यंतचे शिक्षण घेतलेले रामशेठ चांगू ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी कॉलेजला पदव्युत्तर शिक्षण व संशोधन केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यास जागेची आवश्यकता असल्याचे लक्षात घेऊन भव्य अशी ३६ हजार स्क्वेअर फुटाची पाच मजली इमारत त्यांनी कृतज्ञतापूर्वक बांधून दिली आहे. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेजच्या जुन्या प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचे नुतनीकरणदेखील त्यांनी करून दिले आहे. यासाठी ९ कोटी रुपये पर्यंत खर्च झालेला आहे. या इमारतीस लोकनेते रामशेठ ठाकूर भवन हे नाव रयत शिक्षण संस्थेने दिले असून तिचे उद्घाटन सोमवारी २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, देशाचे नेते माजी केंद्रीय कृषीमंत्री खासदार शरदराव पवारसाहेब यांच्या हस्ते होणार आहे. या लोकनेते रामशेठ ठाकूर भवन व नूतनीकरण केलेल्या प्रशासकीय उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे भूषवणार आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या या दातृत्वाचा गौरव करीत त्यांचा विशेष सत्कार, रयत शिक्षण संस्थेतर्फे केला जाणार आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे छत्रपती शिवाजी कॉलेजचे माजी विद्यार्थी असून त्यांनी कमवा आणि शिका योजनेतून पदवी मराठी पर्यंतचे शिक्षण या महाविद्यालयात घेतले असून पुढच्या काळात शिक्षक, उद्योजक, राजकारणी म्हणून प्रवास करत ते रायगड जिल्ह्याचे खासदार देखील झाले होते. १२व्या १३ व्या लोकसभेत ते संसद सदस्य म्हणून निवडून गेले होते. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात गव्हाण हे त्यांचे गाव. रयत शिक्षण संस्था या आपल्या मातृसंस्थेबद्दल त्यांना अतीव प्रेम आणि जाणीव असल्याने रयत शिक्षण संस्थेला मोठ्या प्रमाणात त्यांनी देणग्या दिल्या आहेत. आपण ज्या कॉलेजमध्ये शिकलो, त्या कॉलेजच्यासाठी भरभरून मदत केली आहे. वर्ग खोल्यांची अडचण पाहून भव्य अशी तळमजला सहित पाच मजली इमारत त्यांनी स्वखर्चाने कृतज्ञतापूर्वक बांधून दिली आहे. ८ कोटी पर्यंतचा खर्च या इमारतीस आला आहे. या इमारतीस साधेपणाने राहून सेवा करण्याचा कर्मवीर यांचा वारसा त्यांनी जपला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर भवन हे नाव रयत शिक्षण संस्थेने दिले असून तिचे उद्घाटन सोमवारी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या इमारतीशिवाय छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रशासकीय इमारतीचे नुतनीकरणकरण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी १ कोटी पर्यंतची रक्कम




दिलेली आहे. या नुतनीकरण केलेल्या इमारतीचे उद्घाटनदेखील शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या देणगीबद्दल त्यांचा विशेष सत्कार देखील रयत शिक्षण संस्थेतर्फे केला जाणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर भवन छत्रपती शिवाजी कॉलेज व रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि येणाऱ्या पिढ्यांना सेवाभावाची प्रेरणा देणारा, सामाजिक जाणीव तेवत ठेवणारा दीपस्तंभ असणार आहे.

रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव, पैगंबरवासी इस्माईलसाहेब मोहम्मद मुल्ला यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पुण्यतिथी निमित्त त्यांच्या नावाने दरवर्षी दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. या वर्षी त्यांच्या ४८ व्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य नामदार दिलीप वळसे पाटील यांना इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार द्यावयाचे रयत शिक्षण संस्थेने जाहीर केले आहे. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांचे हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह, रयत वस्त्र, शाल आणि पंचवीस हजार रुपये रोख देऊन हा पुरस्कार याच समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान रयत सदर पुरस्कार सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय योगदान देणाऱ्या व्यक्तीस दिला जातो. यापूर्वी हा पुरस्कार मा.डॉ. एन.डी.पाटील,क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, डॉ.पतंगराव कदम,मा. रावसाहेब कसबे,मा.गणपतरावजी देशमुख,उल्का महाजन,उषा मडावी, एन.डी. आर. एफ. टीम, मा.रामशेठ ठाकूर इत्यादी मान्यवरांना देण्यात आला आहे. या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ.अनिल पाटील हे भूषविणार आहेत. या समारंभास ॲड.भगीरथ शिंदे,रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर, रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाच्या सहसचिव प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड ,तसेच रयत शिक्षण संस्थेच्या, माध्यमिक विभागाचे सचिव मा.संजय नागपुरे,रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे ,संस्थेचे ओ. एस.डी. प्राचार्य शहाजी डोंगरे, अन्य मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ,पैगंबरवासी इस्माईलसाहेब मुल्ला यांचे कुटुंबीय ॲड. दिलावर मुल्ला व परिवार ,रयत, शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,जनरल बॉडी सदस्य, शैक्षणिक, राजकीय ,व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर इत्यादी उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम शासनाच्या कोविड संबंधीच्या नियमांचे पालन करून होणार आहे.

Daily Muktagiri published by printer, publisher, owner and editor Anil Shivajirao Desai printed at Muktagiri Press, 455/2/17, Sadarbazar, Satara and published at Shivsampada, 46, Mutha Colony, Sadarbazar, Satara. RNI Regd No. 69769/98